साप्ताहिक

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ५१ ● मंगळवार, दि. ६ ते १३ मे २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू

## भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,रिसोड च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



राज्य मंडळाने जाहीर केलेल्या फ्ए फेब्रुवारी २०२५ वर्ग १२ वी च्या परीक्षेच्या निकलामध्ये भारत उच्च माध्यमिक शाळा,रिसोड ने उकृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.

शाळेच्या कला शाखेचा निकाल ९१.१७टक्के,वाणिज्य शाखेचा निकाल ९४.७३ टक्के आणि विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के असून विज्ञान शाखेत एकूण प्रविष्ट २१७ विद्यार्थ्यांपैकी ९० टक्केच्या वर १ विद्यार्थी,८० टक्केच्या वर ९ विद्यार्थी,२८ विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत आणि १५८ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. प्रथम क्रमांक कु. कांचन शंकर केंद्रे ९० टक्के गुण आणि द्वितीय क्रमांक कु.अंजली शैलेश काटे ८९ टक्के गुण प्राप्त केले.

दी आर्य शिक्षण संस्था, रिसोड चे अध्यक्ष तथा माजी खासदार श्री. अनंतरावजी देशमुख, विश्वस्त सौ जयाताई देशमुख, सचिव ?ड नकुलदादा देशमुख, सर्व सन्माननीय संचालक मंडळ यांनी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व वर्ग खोल्यांमध्ये डिजिटल बोर्ड द्वारे शिकविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.तसेच नीट/जेईई परीक्षेची तयारी ही पूर्णवेळ इथे करून घेण्यात येते. अशी सुविधा असणारे जिल्ह्यातील हे एकमेव कनिष्ठ महाविद्यालय आहे.

प्राचार्य श्री संजय भांडेकर सर, उपप्राचार्य श्री शर्मा सर सर,पर्यवेक्षक श्री थोरात सर तथा प्राध्यापक, प्राध्यापिका,शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन व कौतुक केले.

■ कला शाखेचा निकाल ९१.१७ टक्के

■ वाणिज्य शाखेचा निकाल ९४.७३ टक्के

■ विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के

## संत तुकाराम विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा




रिसोड : संत तुकाराम महाराज विद्यालय कंकरवाडी शाळेत दिनांक १ मे२०२५लाजागतिक कामगार दिनव महाराष्ट्रदिन साजरा करण्यातआला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव जाधव, प्रमुख पाहुणे म्हणून बाबारावजी घुगे, बबनराव कांबळे ,संचालक सुनील ढेकळे, संचालिका अश्विनी घिगे व शिवाजी माहोरे हे होते. संत तुकाराम महाराज, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटो प्रतिमेचेपूजन करून शाळेतील ध्वजारोहण बाबाराव घुगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगीशाळेचा निकालघोषितकरून गुणपत्रिकेचे वाटप करण्यात आले. सायन्स ऑलम्पिक परीक्षा पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला. सायन्स ऑलिंपिक गणित परीक्षेमध्ये प्रणव आश्रुबा कोल्हे याने गोल्ड मेडल तसेच इंग्रजी ऑलम्पिक परीक्षेत गोल्ड मेडल मिळवल्याबद्दल प्रणव दिगंबर महामुने यांचा सत्कार मान्यवराचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन सानप वआभार मनोज जाधव यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका ,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. श.प्र.

## तहसील कार्यालयात महाराष्ट्र दिनी वीर पिता व मातेचा सत्कार

रिसोड : एक मे महाराष्ट्र दिनानिमित्त ने रिसोड येथील तहसील कार्यालयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात वीर पिता व वीरमाता चा सत्कार करण्यात आला.



तत्पूर्वी रिसोड मालेगाव विधानसभेचे आमदार अमित झनक यांचा हस्ते तहसील कार्यालय येथे झेंडावंदन करण्यात आले. राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत व सलामीनंतर नंतर तहसील कार्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्यावेळी अध्यक्षस्थानी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार अमित झनक हे होते कार्यक्रमात निवृत्ति खिल्लारे,सुरेश शेंडे ,मैनावती शेंडे. या वीर पिता व वीरमातांचा शाल पुष्पगुच्छ श्रीफळ देऊन आमदार अमित झनक तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांचे हस्ते सत्कार सन्मान करण्यात आला यावेळी कृषी अधिकारी तावरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन शिवकन्या कोतीवार, धनंजय काष्टे यांनी केले आभार प्रदर्शन सुधाकर पडधान यांनी केले. यावेळी कार्यक्रमात प्रतिष्ठित नागरिक पत्रकार महसूल अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.ता.प्र.

## उत्तमचंद बगडीया महाविद्यालयात महाराष्ट्र दिन

रिसोड : स्थानिक उत्तमचंद बगडिया महाविद्यालयात दिनांक १ मे २०२५ ला जागतिक कामगार दिन व महाराष्ट्रदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर विनोद कुलकर्णी , प्रमुख पाहुणे म्हणून विमलाताई बगडिया व कविता बगडिया ह्या होत्या.

ध्वजारोहण डॉ. कुलकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचा निकाल घोषित करून गुणपत्रिकेचे वाटप करण्यात आले.तसेच संस्थेच्या सदस्या सौ. कविता बगडिया (अग्रवाल) यांची कन्या कु दिव्या अग्रवाल यांनी परीक्षेत९८.४० टक्के गुण



प्राप्त करून विशेष प्रविण्य मिळविल्या बद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राम जुनघरे तर आभार प्रा. राऊत यांनी केले. यावेळी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.(वि. प्र)

## पाटील महाविद्यालयात तुकडोजी महाराज व बसवेश्वर जयंती

रिसोड : स्थानिक स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यल्यात सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजवमहात्माबसवेश्वर यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एन.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा.डॉ.आदिनाथ बदर यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.एम.एन. गायकवाड यांनी तुकडोजी महाराज यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखले जाते. अंधश्रद्धा



निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. महात्मा बसेश्वर हे बाराव्या शतकातील वीर शेव लिंगायत संप्रदायाचे प्रसारक धर्मगुरू असून त्यांच्या जन्म कर्नाटक मधील विजापूर जिल्ह्यात इंगळेश्वर बागेवाडी या गावी झाला बसवअण्णांनी जनसामान्यांना सहज साधी शिकवण दिली त्यांची शिकवण साधी सोपी होती. असे मत प्रा. डॉ. सिद्धार्थ इंगोले यांनी केले.आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.केशव कोकाटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी,प्रा. डॉ. आम्रपाली भगत, प्रा. डॉ. तनय गोडे यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.(वि. प्र)

# फुलशेतीला हवे पाठबळ

फुल उत्पादनात भारत जगातील दुसर्या क्रमाकांचा देश आहे. तरी जागतिक बाजारपेठेत आपल्या देशाचा वाटा खूपच कमी आहे. त्यामुळे फुलशेतीला पाठबळ देण्याची गरज आहे. २०२३-२४ मध्ये भारताने केवळ १८,६७८ टन फुलांची निर्यात केली. हे प्रमाण आंतरराष्ट्रीय बाजारातील आर्थिक उलाढालीत केवळ ०.६ टक्केच आहे. यामागे वाहतूक, साठवणूक, गुणवत्ता नियंत्रण आणि निर्यात धोरणातील अडचणी कारणीभूत आहेत. फुलशेती ही पारंपरिक शेतीच्या तुलनेत अधिक नफा देणारी मानली जाते. आयएमएआरसीच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये भारतातील फ्लोरीकल्चर बाजाराचा आकार २९२ अब्ज रुपये इतका होता आणि २०३३ पर्यंत तो ७४४ अब्ज रुपयांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

भारतात गुलाब, झेंडू, ग्लॅडिओलस, कार्नेशन, अँथुरियम, गेरबेरा, ऑर्किड्स आणि लिली यांसारख्या फुलांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. ग्रीनहाउस तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उच्च दर्जाची फुले उत्पादन करणे शक्य झाले आहे. भारतातून होणार्या निर्यातीत प्रामुख्याने गुलाब, लिली, गुलछडी, कार्नेशन आदींचा समावेश होतो. अन्य फुलांना निर्यातक्षम करण्याची तयारी अद्याप झालेली नाही, मात्र काही दुर्मिळ प्रकारातील ऑर्किड आणि विशेष प्रकारच्या देशी फुलांचे मोठे उत्पादन घेण्याचे प्रयत्न सुरू असून भविष्यात त्याचीही निर्यात वाढू शकते, अशी स्थिती आहे. हीच अवस्था फुलांपासून तयार होणार्या कलाकृती, साहित्यांची आहे. वाळलेली फुले, सजावटीचे सामान, उच्चप्रतीचे अत्तर, तेल आदींचा उल्लेख करता येईल. अर्थात या उत्पादनांना प्रोत्साहन दिले तर परदेशात चांगली जागा मिळू शकते. यासंदर्भात गांभीर्याने विचारमंथन केले जात आहे. कारण भारत हा नैसर्गिक रुपाने जागतिक फूल बाजारात एक मोठा निर्यातदार देश म्हणून समोर येऊ शकतो. देशातील विविध भागात असलेल्या फुलशेतीवर हवामान बदलाचा होणारा परिणाम वेगवेगळा आहे आणि या जोरावर सर्व प्रकारच्या फुलांचे उत्पादन घेत भारत वर्षभर जगाला फुलांचा पुरवठा सहजपणे करू शकतो. प्रामुख्याने वर्षानुवर्षे फुलांची निर्यात करणार्या देशांतून हिवाळ्यात पुरवठा कमी होऊ लागतो, तेव्हा ती जागा भारत भरून काढू शकतो. ग्रीन हाउसच्या निकषाचे पालन करत चांगल्या प्रतीच्या फुलांची लागवडही होऊ शकते आणि खिशाला अधिक कात्री देखील बसणार नाही. दर्जेदार भारतीय फूल जागतिक बाजारपेठेत वाजवी भावात उपलब्ध होऊ शकतात आणि परदेशातील फुलांशी स्पर्धा करू शकतात. पश्चिम देशांप्रमाणे भारतात पॉलिहाउससाठी उन्हाळ्यात कृत्रिम रुपात कुलिंग करण्याची किंवा हिवाळ्यात उष्ण वातावरण करण्याची आवश्यकता भासत नाही. आपल्याकडे अनेक परदेशी फुलांची ऑफ सिझन शेती देखील अन्य काळात मर्यादित प्रमाणात करणे शक्य आहे. स्वस्त आणि कुशल कामगारांची उपलब्धता असण्याचा देखील फुलशेतीला आणखी लाभ मिळू शकतो. याशिवाय भारत भौगोलिक रुपातून दोन महत्त्वाची निर्यात स्थळं युरोप (हॉलंड हे फुल व्यापाराचे आघाडीचे केंद्र) आणि पूर्व आशिया (जपान) या दोघांच्या मधोमध आहे. या दोन्ही केंद्रांना फुलांची निर्यात करणे सुलभ आहे. फुलशेतीवरच्या अनेक अभ्यासानंतरचे निष्कर्ष पाहिल्यास ९० टक्क्यांहून मालकी असलेल्या जमिनीवर तसेच सीमांत आणि लहान शेती क्षेत्रात पारंपरिक पीक घेण्याऐवजी फुलशेती फायदेशीर ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे. २०२४-२५च्या आर्थिक पाहणी अहवालात फुलशेतीचा विशेषत्वाने उल्लेख केला आहे. सर्वेक्षणात म्हटल्यानुसार, धान्य, डाळी, तेलबिया या पारंपरिक पिकांतील अंतर पीक म्हणून फुलशेती पीक चक्रात फायदेशीर आहे. यात पारंपरिक फुलशेतीऐवजी निर्यातक्षम फुलांकडे अधिक लक्ष दिल्याने व्यापक बदल पाहवयास मिळाला आहे. अर्थात फुलशेतीत अनेक अडथळे आहेत आणि ते विकासाला मारक ठरत आहेत.


# नवचेतना ग्रुपचा स्तुत्य उपक्रम : मुक्या प्राण्यांसाठी पिंगळाक्षी देवी परिसरात पाण्याच्या हौदाची सुविधा

रिसोड - शहरातील नवचेतना ग्रुप नेहमीच समाजोपयोगी आणि सकारात्मक कार्यात अग्रेसर असून, याच धर्तीवर मुक्या जनावरांसह पक्षी आणि इतर प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे.

नवचेतना ग्रुपचे प्रमुख विनोद बांगर यांच्या संकल्पनेतून प्रेरित होऊन शहरातील समाजसेवक भारत कोकाटे यांनी स्वतःच्या खर्चातून रिसोड शहरालगत असलेल्या पिंगळाक्षी देवी तलाव परिसरात मुक्या प्राणी आणि पक्ष्यांसाठी पाण्याच्या हौदाची व्यवस्था केली. या पाण्याच्या हौदाचे उद्घाटन पत्रकार संघाचे प्रमुख तथा पिंगळाक्षी देवी संस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संतोष वाघमारे व गणेश भारत कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पत्रकार जयंत वसमतकर, गजानन बानोरे, पक्षीप्रेमी मुलंगे अण्णा, लोकमत समाचारचे पत्रकार केशव गरकळ, नवचेतना ग्रुपचे प्रमुख विनोद बांगर व सदस्य संतोष हाडे, सागर बांगर, ओम तूपसुंदर, गणेश कांबळे,




लहुजी बांगर, सुरेश हौदावाले तसेच नवचेतना ग्रुपचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी संतोष वाघमारे, जयंत वसमतकर आणि गजानन बानोरे यांनी नवचेतना ग्रुपच्या सकारात्मक उपक्रमाचे कौतुक करत सखोल मार्गदर्शन केले.




# पंतप्रधान मोदींनी केले वैभव सूर्यवंशीचे कौतुक



**पाटणा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या पाटणामध्ये आयोजित खेलो इंडिया यूथ गेम्सच्या समारंभाप्रसंगी व्हर्चुअली संबोधित केले. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारचा युवा क्रिकेटर वैभव सूर्यवंशीचे कौतुक केले. युवा क्रिकेटर वैभव सूर्यवंशी यानं संपूर्ण देशाचे लक्ष आपल्याकडे केंद्रीत केलेआहे. तो जेवढा अधिक खेळेल तेवढा तो अधिक उजळून निघेल असं मोदी यांनी म्हटले आहे. आपण सर्वांनी बिहारचा मुलगा वैभव सूर्यवंशी याचं आयपीएलमधील प्रदर्शन पाहिले आहे. वैभव यांने सर्वात कमी वयात एवढा मोठा रेकॉर्ड बनवला आहे. त्यांच्या यशामागे त्याने घेतलेली मेहनत आहे. तो वेगवेगळ्या स्थरावर क्रिकेट खेळला त्याची देखील त्याला मदत झाली. याचाच अर्थ असा आहे की, जो जेवढे खेळेल, तेवढे त्याला अधिक यश मिळेल, असेही यावेळी मोदी यांनी म्हटले आहे.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)




- उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची ग्वाही
- खंडणीखोरांना मकोका लावणार, जीएसटी ट्रायब्यूनलची स्थापनाही करणार

# उद्योजकांच्या मागण्या पूर्ण करणार

**वाळूज :** छत्रपती संभाजीनगर भागातीलऔद्योगिक वसाहत एक दर्जेदार आणि नाविन्यपूर्ण वसाहत म्हणून उदयास आलेली आहे. आता स्थिर सरकार असून आम्ही निर्णय घेणारी माणसं आहोत. लवकरच आपल्या मागण्यांची पुर्तता करणे हे आमच कर्तव्य असल्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी रविवारी वाळूज येथे दिली.

संवाद उद्योजकांशी या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार हे रविवारी वाळूजच्या मसिआ सभागृहात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले की, लवकरच आपले प्रश्न सोडविण्याचा आमचा प्रयत्न राहील. उद्योजक आणि स्थानिक प्रशासन यामध्ये समन्वय असवा. वाळूज औद्योगीक क्षेत्रातील अतिरीक्त पोलिस स्टेशनचा प्रस्ताव पुढे नेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील असे सांगून उद्योजकांनी देखील आपल्या कंपनीच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे असे सांगितले.

तसेच खंडणी खोरांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिस आयुक्त प्रविण पवार यांना खंडणीखोरांना व उद्योजकांना नाहक त्रास देणाऱ्यांना मकोका लावायला मागे पुढे पाहू नये असे निर्देश दिले. तसेच जीएसटी चे ट्रायब्यूनलचे ऑफिस हे छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल असे देखील त्यांनी याप्रसंगी सांगितले. वाळूज औद्योगिक क्षेत्रातील ओॲसिस चौक येथे उड्डाणपुल तसेच, वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आवश्यक संबंधित विभाग यांच्यासोबत सकारात्मक कार्यवाही केली जाईल असे आश्वासन दिले.

यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून आ. सतीश चव्हाण, आ. विक्रम काळे, मा.आ. कैलास पाटील, पोलिसआयुक्त प्रविण पवार, पोलिस उपआयुक्त नितीन बगाटे, अभिजीत देशमुख , तसेच मसिआचे अध्यक्ष अर्जुन गायकवाड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मसिआचे माजी अध्यक्ष सुनील किर्दक यांनी यावेळी मसिआच्या आजपर्यंतची वाटचाल आणि कार्याबद्दल सविस्तर माहिती दिली.

## औद्योगिक क्षेत्रातील इतर मागण्या

छत्रपती संभाजीनगरते पुणे एक्सप्रेस वे होणार आहे त्यातून रांजनगाव व चाकण औद्योगिक क्षेत्रासाठी जोडणी मिळणे, शेंद्रा, वाळूज आणि बिडकिन औद्योगिक क्षेत्र हे रिंग रोडने एकमेकांशी जोडलेले असावे, वाळूज औद्योगिक क्षेत्रात रांजणगाव स्वतंत्र पोलिस स्टेशनची निर्मिती करणे ,औद्योगिक क्षेत्रांमध्ये विशेष बाब म्हणून सुरक्षेसाठी यंत्रणा कार्यान्वित करणे बाबत सहकार्य करणे ,संरक्षित, सुरक्षित उद्योग नगरी होणे गरजेचे आहे. माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांचा आणि खंडणी खोरांचा कायमच बंदोबस्त करण्यासाठी शासनाचे कडक धोरण आणावे.




# सहकारी संस्थांनी नवीन बदल आत्मसात करावे

## डॉ. जयराज कोरपे यांचे प्रतिपादन

वाशिम : सहकार चळवळही १८४४ पासून सुरु झाली आहे. अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतकरी बांधव तसेच गरज असलेल्या लोकांची निकड पुर्ण करण्यासाठी व त्यांना सावकारांच्या कर्जातून वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु केले आहे. त्यामुळेच अकोला वाशिम जि.म. बँकेवर ग्राहकांचा व ठेवीदारांचा विश्वास आहे. सहकार चळवळ वाचविणे तसेच या क्षेत्रातील नविन बदल आत्मसात करणे काळाजी गरज आहे. असे प्रतिपादन जिल्हा बॅंकेचे संचालक डॉ. जयराज संतोषकुमार कोरपे यांनी वाशिम येथे बोलतांना केले.

दि. अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती बँकेच्यावतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षा निमित्त पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था व इतर बिगर सहकारी संस्था संस्थेच्या प्रशिक्षण कार्य शाळेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन संचालिका श्रीमती मंदाताई चौधरी यांच्याहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे संचालक महादेवराव काकडे गुरुजी याची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहूणे म्हणून आ. किरणराव सरनाईक, सहकार नेते दामु अण्णा गोटे, जिल्हा उपनिबंधक महेश कच्छवे , कृउबा समिती संचालक राजू चौधरी यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यशाळेला सहकारी संस्था अधिनियम सी.आर.आर. एस.एल. आर व सहकारी संस्थांनी कामकाज कसे करावे याबाबत बी.जे. काळे यांनी तर सहकारी संस्थांना लागू असलेले आयकर नियम व त्यांच्या तरतुदी बाबत मारोती भोयर यांनी मार्गदर्शन केले. पगारदार कर्मचारी सहकारी पत संस्था व इतर बिगर शेती संस्था प्रशिक्षण कार्यशाळा अतिशय उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मार्केटींग अधिकारी ग्रेड १ पंकज दिवनाले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाशिम शाखा व्यवस्थापक किशोर चव्हाण यांच्यासह कर्मचारी सर्वश्री अजिक्यनवले, निखिलइसळ, चेतनभड, मोईनशेख, पंकज देशमुख, अभिजीत शिकारे, धनराज गोटे, सुरज सुर्वे, नितीन चौधरी, अविनाश काटेकर, सचिन देशमुख, अक्षय ठाकरे, अजय इंगोले, संतोष काकडे, भगीरथ काळे, ज्ञानेश्वर कव्हर आदींनी अथक प्रयत्न केले. प्रास्ताविक उपमुख्याधिकारीपी.एस. ठाकरे तरआभार के.एम. चव्हाण शाखाधिकारी यांनी मानले. (जि.प्र.)

# उत्तमचंद बगडीया महाविद्यालयाचा बारावीचा १०० टक्के नेत्रदीपक निकाल










काशिबाई मगनलालजी बगडीया बहुउद्देशिय अल्पसंख्यांक संस्था, रिसोड द्वारा संचालित उत्तमचंद बगडीया महाविद्यालयाने बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे. कला शाखेचा निकाल ९३टक्के लागला असून या शाखेत आदर्श महिपती इंगळे यांनी ६१.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला, तर कु. विशाखा पूनम राठोड यांनी ६१ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेने तर १००टक्के निकालाची नोंद केली आहे. या शाखेत रोहन दीपक काळदाते यांनी ९०.८३टक्के गुण मिळवून प्रथम स्थान प्राप्त केले, तर कु. नंदिनी सुनील कर्हे यांनी ७०.८३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. विज्ञान शाखेचा निकाल ९८ टक्के लागला असून कु. निकिता नारायण वानरे यांनी ७३.३३टक्के गुणांसह प्रथम, तर कु. आरती शिवाजी जवळे यांनी ७१.५० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. व्यावसायिक अभ्यासक्रम शाखेने देखील १००टक्के निकाल नोंदवला आहे, ज्यात विशाल सिद्धार्थ खंदारे यांनी प्रथम आणि विनोद अभिमान कांबळे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री उत्तमचंदजी बगडिया, सचिव श्री. विठ्ठलराव वसू व सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी आणि शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे. संस्थेने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

**■ आदर्श महिपती इंगळे यांचा ६१.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक**

# जलतारा प्रकल्प आढावा बैठक



रिसोड - आज दिनांक ०५ मे २०२५ रोजी, रिसोड तालुक्यातील जलतारा प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक मा. वैशाली देवकर, उपविभागीय अधिकारी, वाशिम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस मा. प्रतीक्षा तेजनकर, तहसीलदार, रिसोड; तालुका कृषी अधिकारी; नायब तहसीलदार (महसूल), विजय साबळे, विस्तार अधिकारी, रिसोड तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी सर्व, ग्राम विकास अधिकारी सर्व, मंडळ अधिकारी सर्व, कृषी सहाय्यक सर्व, महसूल सेवक सर्व, आणि रोजगार सेवक सर्व तसेच श्री. सुधाकर पडघाण महसूल सहाय्यक, श्री. गजानन देशमुख, महसूल सहाय्यक तहसिल कार्यालय रिसोड, तसेच इतर सर्व अधिकारी / कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत जलतारा प्रकल्पाच्या अंमलबजावणी संबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी आणि वेळेत पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी मा. उपविभागीय अधिकारी आणि मा. प्रतीक्षा तेजनकर, तहसीलदार रिसोड यांनी प्रकल्पासंदर्भात कार्यवाहीच्या स्पष्ट दिशा दिल्या. प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्य करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीच्या माध्यमातून प्रकल्पाला आवश्यक गती मिळावी यासाठी ठोस निर्णय घेण्यात आले असून, लवकरच त्याची अंमलबजावणी सुरु होणार आहे. या बैठकीमुळे जलतारा प्रकल्पाच्या कामास निश्चितच नवीन गती आणि दिशा मिळेल, असा विश्वास सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

प्रतीक्षा तेजनकर तहसीलदार, रिसोड

# गोकृपा अमृत शेती पध्दती व नैसर्गिक हळद उत्पादनावर प्रशिक्षण



रिसोड : भारतीयकृषीअनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र अंतर्गत उद्यानविद्या विभागाच्यावतीने नैसर्गिक शेती पद्धतीचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. मागील सहा-सात वर्षांपासून अनेक शेतकरी गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करून हळद, संत्रा, सोयाबीन, तूर, कांदा आदी पिकांचे उत्पादन यशस्वीरित्या घेत आहेत.

गेल्या हंगामात जवळपास २०० शेतकऱ्यांनी प्रति एकर सरासरी ३५ क्विंटल हळदीचे उत्पादन घेतले. यंदा प्रति एकर ४५ क्विंटल उत्पादन मिळवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली २९ एप्रिल रोजी केव्हीके प्रक्षेत्रावर गोकृपा अमृत शेती पद्धती व नैसर्गिक हळद उत्पादन तंत्र या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्र, नवचैतन्य शेतकरी उत्पादक कंपनी आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केव्हीकेचे प्रभारी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. के. देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून मंडळ कृषी अधिकारी . विलास वाघ, तसेच शेतकरी प्रतिनिधी म्हणून प्रगतिशील शेतकरी मोबीन शहा उपस्थित होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून गोकृपा अमृत पद्धतीचे जनक गोपालभाई सुतारिया यांनी ऑनलाइन माध्यमातून प्रशिक्षण दिले. डॉ. पी. डी. के. व्ही. , अकोला येथील मृदशास्त्र विभागाचे डॉ. नितीन कोंडे आणि केव्हीकेचे उद्यानविद्या तज्ज्ञ . निवृत्ती पाटील यांनी सखोल मार्गदर्शन केले. कमी होणारे सेंद्रिय कर्ब आणि जिवाणूंची संख्या याबाबत चिंता व्यक्त करून नैसर्गिक शेतीतील कंपोस्ट व जिवाणू विरजणाचे महत्त्व विशद केले. मंडळ कृषी अधिकारी . वाघ यांनी नैसर्गिक शेती मिशन योजनेची माहिती देऊन, निवडलेल्या गावांनी या योजनेचा लाभ घ्यावा व उत्पन्न दुप्पट करावे असे आवाहन केले. निवृत्ती पाटील यांनी नैसर्गिक शेतीतील निविष्ठा, त्यांची वापर पद्धती, अमृत अमृत वापरून शेणखत कुजविणे, तसेच हळद पिकाचे संपूर्ण तंत्रज्ञान स्पष्ट केले. वि.प्र.

# शिष्यवृत्ती परीक्षेत सरनाईज इंग्लिश स्कुलचे यश



## १९ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

रिसोड : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (वर्ग ५ वी) आणि पूर्व माध्यमिक (वर्ग ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षांचा निकाल नुकताच २५ एप्रिल ला जाहीर झाला.

त्यामध्ये दि आर्य शिक्षण संस्था द्वारा संचालित सनराईज इंग्लिश स्कूल रिसोड च्या विद्यार्थांनी घवघवीत यश संपादन केले. वर्ग ५ वी मधून कृष्णा बगडे, रिधम गीऱ्हे, कुंजन देशमुख, आरव अग्रवाल, आराध्या बोरा या विद्यार्थ्यांनी पात्र होण्याचा बहुमान मिळवला तसेच वर्ग ८ मधून स्वराली गीऱ्हे, आरुषी क्षीरसागर, रुद्र जायभाये, रुद्र हराळ, पार्थ मेने, वेदांत देशमुख, तन्मय बोन्डे, , विजया खंडागळे, संस्कृती पायघन, युवराज सानप हे विद्यार्थी पात्र ठरले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे दि आर्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. अनंतराव देशमुख , सचिव ॲड. नकूल देशमुख तसेच शाळेच्या अध्यक्षा सौ. जयश्रीताई देशमुख यांनी अभिनंदन केले. प्राचार्या सौ. रोजमेरी जोस यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. वि.प्र.

# श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय रिसोडच्या विद्यार्थ्यांचे सुयश

रिसोड(प्रतिनिधी) :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ चा निकाल दि ५ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला असून, यामध्ये श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड च्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.

या कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी कला, उर्दू कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकूण २५५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. यापैकी २४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९७.२५ % इतका लागला आहे. यामध्ये विज्ञान शाखेतुन कुमारी साक्षी पंढरी तिखे ही ८०.८३ % गुण मिळवुन प्रथम आली, तर विज्ञान शाखेतून



रामेश्वर प्रकाश गोरे ८२.६७ % गुण घेऊन प्रथम आला आहे. शिवतीर्थ मोतीराम

कु. धनश्री विश्वास कातुरे ८०.०० % द्वितीय, कु. अनिषा अनिलराव सरनाईक व कु. मनीषा भिमराव इंगळे ह्या विद्यार्थीनी ७८.१७% तृतीय आल्या आहेत. वाणिज्य शाखे मधून प्रथम कु.जया गणेश हटकर ७४.१७%, द्वितीय ज्ञानेश्वर भारत तांबिले ७१.१७ % तर तृतीय हर्षल सुनील लोमटे ७०.६७ % आला आहे. कला शाखा (उर्दू) मधून कु. हुमा परविन इमरोज खान ७७.८३ % प्रथम, कु. मुस्कान परवीन शेख गफूर ६४.३३ % द्वितीय, व कु.अशमिरा बी शेख हमीद ६३.६७ % तृतीय आली आहे. कला शाखा (मराठी) मधून पवनकर ७७.१७ % द्वितीय व कु. प्रतीक्षा रुपराव खंडागळे ७७.०० % गुणासह तृतीय आली आहे. या कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण २५५ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी १४ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले.११९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत तर १०९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व १५ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष तथा शिक्षक आमदार ॲड.श्री किरणराव सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय रिसोड चे शाळा समिती संचालक श्री पंजाबराव देशमुख, श्री जितेंद्रकुमार दलाल,श्री संजयकुमार जीरवणकर, प्राचार्य श्री संजयराव देशमुख, उपमुख्याध्यापक श्री संजयराव नरवाडे, पर्यवेक्षक श्री. गजाननराव भिसडे यांनी अभिनंदन केले आहे.

# रेतीच्या अवैध वाहतूक करणाऱ्याला १ लाख ८० हजाराचा दंड

## तहसीलदार तेजनकर यांची कारवाई



रिसोड : प्रशासनाच्या वतीने तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या नेतृत्वात रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर १ मे च्या रात्री बारा वाजता कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार, रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना १ मे च्या रात्री साडेअकरा वाजता गुप्त माहिती मिळाली की, लोणी ते रिसोड मार्गावरील भर जहागीर येथील आसरा माता दरम्यान असलेल्या रस्त्यावर एका ट्रक मधून रेतीची अवैध वाहतूक करण्यात येत आहे. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी महसूल प्रशासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यासह १ मे च्या रात्री बारा वाजता मिळालेल्या गुप्त माहितीप्रमाणे घटनास्थळी दाखल होऊन घटनास्थळी उभ्या असलेल्या ट्रकची पाहणी केली असता ट्रक क्रमांक एमएच ३७ टी ९९८९ मध्ये चार ब्रास रेती असल्याचे आढळून आले. सदर रेतीबाबत ट्रकचालक रामेश्वर वामन राठोड राहणार देवठाणा तालुका मंठा यांना विचारणा केली असता त्याच्याजवळ रेतीच्या वाहतुकीच्या परवान्याबाबत कोणतेही कागदपत्रे आढळून न आल्याने रेतीचे अवैध वाहतूक करीत असल्याचे निष्पन्न झाले. सदर ट्रकचा घटनास्थळी पंचनामा करून १ लाख ८० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून चार ब्रासच्या रेतीसह ट्रक रिसोड येथील पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आला आहे. रेतीची अवैध वाहतूक करणारा सदर ट्रक हा दिलीप राऊत लाखाला,वाशिम यांचा असल्याचे समजते. सदरची कारवाई रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या नेतृत्वात मंडळ अधिकारी एस.एम. पडवे, सुनील लोखंडे, पटवारी स्वप्निल धांडे, जि. जि. गरकळ, लखन उसारे, महसूल सेवक मुधोळकर यांच्या पथकाने केली. अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनधारकासह रेती तस्करांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. ता.प्र.

# अर्बन बँकेच्या वतीने डॉ. कावरखे यांचा सत्कार



वाशीम : आरोग्य क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून वाशीम जिल्हयाचे नाव राज्यस्तरावर झळकावणारे व सतत तिन वर्ष आरोग्य क्षेत्रात शासनाचा नंबर एक पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल जिल्हाशल्य चिकीत्सक डॉ. अनिल कावरखे यांचा वाशीम अर्बन बॅकेच्यावतीने मुख्य कार्यालयात बँकेच्या अध्यक्ष श्रीमती शिलाताई सुभाष राठी व उपाध्यक्ष पुरूषोत्तम चरखा यांच्या हस्ते ३ मे रोजी सत्कार करण्यात आला.

सदर सत्कार समांरभाला व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष रामचंद्र देशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी देशमुख, आनंद राठी, डॉ. मुंढे, डॉ. पुरी, शाखा सल्लागार समिती सदस्य तरणसिंग सेठी व मान्यवर उपस्थित होते. जि.प्र.

## केंद्राच्या पीएम-यशस्वी शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचना लागू करण्याचा निर्णय

मुंबई - प्रधानमंत्री यंग अचिव्हर्स स्कॉलरशिप ॲवार्ड स्किम फॉर व्हायब्रंट इंडिया ($PM^2$- YASASVI ) या एकत्रिकृत शिष्यवृत्ती योजनेच्या केंद्राच्या मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.